दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ५०५ वा ● बुधवार, ता. २८ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## यूजीसीच्या 'इक्विटी नियमां'वरुन वाद

### खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा विरोध

**नवी दिल्ली । रयत समाचार**

University Grants Commission (यूजीसी) यांनी ता. १३ जानेवारी २०२६ रोजी जाहीर केलेल्या Promotion of Equity in Higher Education Institutions Regulations २०२६' या नव्या नियमांमुळे देशभरातील शैक्षणिक वर्तुळात तीव्र चर्चा व वाद निर्माण झाला आहे. अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, दिव्यांग व महिलांच्या संरक्षणासाठी हे नियम लागू करण्यात आले असले, तरी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी या नियमांना विरोध दर्शवला आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी दिल्लीतील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी यूजीसी मुख्यालयाबाहेर आंदोलन केले. मुसळधार पाऊस व कडेकोट बंदोबस्तात सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेत या नियमांचा संपूर्णपणे रद्दबातल करण्याची मागणी केली. आंदोलकांनी यूजीसीकडे निवेदन सादर केले.फ दिल्ली विद्यापीठातील पीएच.डी. विद्यार्थी अलोकित त्रिपाठी यांनी




**UGC ची आकडेवारी काय सांगते?**

**२०१९-२० : १७३ भेदभावाच्या तक्रारी, २०२३-२४ : ३७८ तक्रारी, गेल्या ५ वर्षांत : एकूण ११६०, तक्रारी UGC नुसार तक्रारींमध्ये सुमारे ११८% वाढ**

सांगितले की, यूजीसी अधिकाऱ्यांनी निवेदन स्वीकारून काही मुद्द्यांवर चर्चा करण्याचे आश्वासन दिले आहे. इक्विटी स्कॉडमध्ये सर्वसाधारण प्रवर्गातील एका सदस्याचा समावेश, १५ दिवसांत निर्णय घेण्याचे आश्वासन

**विद्यार्थ्यांचा विरोध नेमका का?**

**खुल्या प्रवर्गासाठी बंधनकारक प्रतिनिधित्व नाही, असा आरोप. खोट्या तक्रारींवर ठोस शिक्षेची तरतूद नाही. तक्रार नोंद होताच दोषी ठरवले जाईल, अशी भीती. कॅम्पसमध्ये भीती, अविश्वास व संघर्ष वाढण्याची शक्यता.**

तसेच खोट्या तक्रारी रोखण्यासाठी तक्रारदाराची ओळख गोपनीय न ठेवण्याबाबत विचार करण्याचे संकेत देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट

**UGC चे नवे 'इक्विटी नियम' काय सांगतात?**

**प्रत्येक विद्यापीठ व महाविद्यालयात इक्विटी कमिटी स्थापन करणे बंधनकारक. जात, प्रवर्ग, लिंग, दिव्यांगत्व आदी कारणांवर होणारा भेदभाव रोखणे हा उद्देश. तक्रार नोंद, समुपदेशन, जागरूकता कार्यक्रम राबवण्याची जबाबदारी. नियम न पाळल्यास मान्यता रद्द, फंडिंग थांबवण्यासारखी कारवाई शक्य.**

केले. यूजीसीच्या म्हणण्यानुसार, उच्च शिक्षण संस्थांमध्ये जातीय व सामाजिक भेदभावाच्या तक्रारी वाढत असून, त्या रोखण्यासाठी कठोर व स्पष्ट नियमांची आवश्यकता होती. मात्र विद्यार्थ्यांचा आरोप आहे की, या नियमांमुळे आरोप सिद्ध करण्याची जबाबदारी थेट आरोपीवर येते आणि खोट्या तक्रारींवर ठोस कारवाईची तरतूद नसल्याने गैरवापर होण्याची भीती आहे. दरम्यान,

**'इक्विटी कमिटी'ची रचना**

**एकूण ९ सदस्यांची समिती संस्था प्रमुख, ३ प्राध्यापक, १ कर्मचारी २ सामान्य नागरिक, २ विद्यार्थी प्रतिनिधी, १ समन्वयक९ पैकी किमान ५ सदस्य SC/ST/ OBC/ महिला/दिव्यांग प्रवर्गातील असणे अनिवार्य.**

डाव्या विचारसरणीच्या All India Students' Association (AISA) या विद्यार्थी संघटनेने नियमांचे समर्थन केले आहे. ओबीसींचा समावेश हा स्वागतार्ह असला तरी समित्यांतील प्रतिनिधित्व व भेदभावाच्या व्याख्या अधिक स्पष्ट असाव्यात, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे. सरकारने हे नियम पारदर्शकता, समता व उत्तरदायित्वासाठी असल्याचे स्पष्ट केले असले, तरी विद्यार्थ्यांमध्ये नाराजी कायम असून हा मुद्दा आता शैक्षणिक मर्यादेपलीकडे जाऊन सामाजिक व राजकीय चर्चेचा विषय ठरत आहे.



## झेडपी निवडणुकीनंतर सातारा गॅझेट लागू होणार?

### मराठा आरक्षण उपसमितीच्या बैठकीत मंत्रालयात चर्चा

**मुंबई । रयत समाचार**

मराठा आरक्षणासंदर्भात सातारा गॅझेट लागू करण्याबाबत महत्त्वाची हालचाल सुरू झाली असून जिल्हा परिषद निवडणुकांनंतर सातारा गॅझेट लागू होण्याची शक्यता आहे. मराठा आरक्षण उपसमितीची आज मंत्रालयात बैठक पार पडली. या बैठकीत सातारा गॅझेटियरवर प्रामुख्याने चर्चा झाली. मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या बैठकीत हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. याचबरोबर सातारा गॅझेट लागू करण्यासंदर्भात विविध कायदेशीर व प्रशासकीय बाबींवर चर्चा करण्यात आली. राज्य सरकारने यापूर्वी हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला असून त्यानुसार मराठवाड्यातील मराठा समाजातील अनेकांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ मिळू लागला आहे. मात्र, मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावेळी सरकारने हैदराबादसह सातारा गॅझेट लागू करण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे सातारा गॅझेट कधी लागू होणार, याकडे पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाजाचे लक्ष लागले होते. सूत्रांच्या माहितीनुसार, राज्यात सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे सध्या आचारसंहिता लागू आहे. त्यामुळे सातारा गॅझेट लागू करण्यास विलंब होत आहे. मात्र, हा विषय केवळ 'इंटरप्रिटेशन'चा असल्याने निवडणुका संपल्यानंतर यावर अंतिम निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करण्यात आले होते. त्या वेळी मंत्री उदय सामंत आणि उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिलेल्या आश्वासनानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले होते. जिल्हा परिषद निवडणुकांनंतर सातारा गॅझेट लागू झाल्यास पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाजाला मोठा दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## महापौर निवडणूक ६ फेब्रुवारीला

### जिल्हाधिकारी पीठासीन अधिकारी

**अहमदनगर । रयत समाचार**

महापौर उपमहापौरपदाच्या निवडीसाठी अहिल्यानगर महानगरपालिकेची विशेष सभा गुरुवारी ता.६ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या सभेत महापौर व उपमहापौरांची अधिकृत निवड करण्यात येणार असून, यासाठी सर्व आवश्यक प्रशासकीय तयारी पूर्ण करण्यात आली आहे. विभागीय आयुक्तांच्या आदेशानुसार, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या या विशेष सभेसाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचा आदेश विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी जारी केला आहे. दरम्यान, ६ फ ेब्रुवारी रोजी नाशिक, धुळे, जळगाव यांसह अहिल्यानगर महानगरपालिकेत एकाच दिवशी महापौर उपमहापौर निवडीसाठी सभा होणार असल्याने राज्याच्या राजकीय वर्तुळात या निवडणुकीकडे विशेष लक्ष लागले आहे. महापौरपदासाठी कोणत्या पक्षाचा उमेदवार बाजी मारणार, याबाबत सध्या राजकीय हालचालींना वेग आला असून, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या राजकारणात चुरस निर्माण झाली आहे.

## आर्थिक प्रगतीपेक्षा एकात्मिक कल्याण महत्त्वाचे- डॉ. बिपीन जोजो

### सीएसआरडीत दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचा समारोप

**अहमदनगर । रयत समाचार**

बीपीएचई सोसायटीचे सीएसआरडी सामाजकार्य व संशोधन संस्था तसेच इंटरनॅशनल जस्टीस मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने भारतातील कामगार वर्गाचे एकात्मिक आरोग्य व कल्याण या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते, या परिसंवादाच्या समारोप कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून मुंबई येथील टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सचे अधिष्ठाता डॉ. बिपीन जोजो, नवी दिल्ली येथील नॅप्स्वीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. संजय भट्ट तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सीएसआरडी संस्थेचे संचालक डॉ. सुरेश पठारे आदी मान्यवरांसह विविध विद्यापीठांतील प्राध्यापक, विद्यार्थी व संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी दोन दिवसीय परिसंवादाचा सविस्तर अहवाल डॉ. प्रदीप जारे यांनी सादर केला. यामध्ये प्रामुख्याने बंगळुरू येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरो सायन्सेस येथील प्रख्यात तज्ज्ञ डॉ.कासी शेकर, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस तुळजापूर कॅम्पसचे उपसंचालक डॉ. रमेश जारे, नवी दिल्ली येथील सुकून सोल्युशन्स प्रा. लि. येथील व्यवस्थापकीय संचालक डॉ. अमोद, जामखेड येथील एकात्मिक ग्रामीण आरोग्य प्रकल्पाच्या संचालक डॉ. शोभा आरोळे, नाशिक येथील समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विलास देशमुख, छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम विद्यापीठाच्या समाजकार्य विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. अविनाश गोरे, पुणे येथील संजीवनशी आश्रमचे डॉ. अशोक ओहोळ, आयएमएस महाविद्यालयाचे संचालक डॉ.एम.बी.मेहता इत्यादी तज्ञ मान्यवर उपस्थित होते.

**परिसंवादात ११ राज्यांतील सुमारे २०० प्रतिनिधी सहभागी झाले होते. एकूण ११० शोधनिबंधांचे सादरीकरण प्रत्यक्ष व ऑनलाइन पद्धतीने झाले. परिसंवादात एकूण १४ तज्ज्ञ वक्ते, बीजभाषण, खुली सत्रे व विविध तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.**

आपल्या बीज भाषणात डॉ. बिपीन जोजो यांनी बालक व आदिवासी समुदायांच्या कल्याणासंदर्भातील अनुभव सांगत, तणावमुक्त जीवन आणि खऱ्या आनंदाच्या संकल्पनेवर विचार मांडले. आर्थिक प्रगतीपेक्षा एकात्मिक कल्याण महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जैवविविधतेचे महत्व स्पष्ट करत त्यांनी विकासासोबतच नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनाचे महत्व अधोरेखित केले. यावेळी



आपले मनोगत व्यक्त करतांना डॉ. संजय भट्ट यांनी सामाजिक क्षेत्रातील नव्या रोजगार संधींवर प्रकाश टाकत, शैक्षणिक संस्थांमध्ये मानसिक आरोग्य समुपदेशकांची आवश्यकता असलेल्या धोरणांमुळे सुमारे ५१ हजार रोजगार संधी निर्माण होऊ शकतात, असे नमूद केले. कौशल्यविकास, महिलांचा वाढता सहभाग व समावेशक कार्यसंस्कृतीची गरज त्यांनी अधोरेखित केली. अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. सुरेश पठारे यांनी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग आणि आंतरशाखीय अभ्यासाबाबत निर्माण झालेला सकारात्मक दृष्टीकोन त्यांनी अधोरेखित केला. एकात्मिक आरोग्याच्या प्रश्नांवर खुलेपणाने चर्चा व संवाद होणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. समाजकार्य क्षेत्रातील विविध तज्ञांनी सद्यस्थितीची वास्तवता व त्यावरील उपाययोजना याविषयी केलेले मार्गदर्शन निश्चितच समाज कार्यकर्त्यांना दिशादर्शक असेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमधून प्रातिनिधिक स्वरुपात काही विद्यार्थ्यांनी आपले अभिप्राय सादर केले. यामध्ये या परिसंवादातून समाजकार्य करिअरसाठी दिशा मिळाली, आरोग्य व मानसिक स्वास्थ्य याबाबत समाजकार्य शिक्षणाचे महत्त्व याविषयी माहिती मिळाली असे मत विद्यार्थ्यांनी अभिप्रायामध्ये मांडले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आसावरी झपके, तर आभार डॉ. सुरेश मुगुटमल यांनी मानले. सीएसआरडीचे डॉ.जेमोन वर्गीस, डॉ. विजय संसारे, वैशाली पठारे, सॅम्युअल वाघमारे, नाजीम बागवान, ट्विंकल ईश्वरी तसेच विद्यार्थ्यांनी सदर राष्ट्रीय परिसंवाद यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.




## महामार्गावर माणुसकीचा पराभव

### महिलांना व चिमुकल्याला प्रसाधनगृह वापरण्यास नकार

**रायगड । गुरुदत्त वाकदेकर**

मुंबईगोवा राष्ट्रीय महामार्गावर प्रवास करणाऱ्या नागरिकांना जर महिलांना व लहान मुलांना प्रसाधनगृहासारख्या मूलभूत सुविधांसाठीही संघर्ष करावा लागत असेल, तर हा प्रकार केवळ धक्कादायक नसून माणुसकीला काळिमा फासणारा आहे. रोहा तालुक्यातील महामार्गालगत असलेल्या एका हॉटेलमध्ये घडलेल्या घटनेमुळे महिला सुरक्षा, बालहक्क आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेवर तीव्र व संतप्त प्रश्न उपस्थित झाले आहेत. दि. २५ जानेवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ९:४५ वाजता, महाबळेश्वर येथून मुंबईकडे येणाऱ्या ४० प्रवाशांच्या गटाला (यामध्ये ७ महिला व एक दोन वर्षांचा चिमुकला यांचा समावेश होता) माणगाव येथे जवळपास दोन तास वाहतूक कोंडीत अडकावे लागले. दीर्घ प्रवास, थकवा आणि अस्वस्थतेमुळे प्रवाशांनी जेवण व प्रसाधनगृहासाठी रोहा तालुक्यातील महामार्गालगत असलेल्या 'हॉटेल मालवणी' येथे थांबण्याचा निर्णय घेतला. मात्र हॉटेलच्या कर्मचाऱ्याने ''मोठ्या गाड्या येथे घेत नाही'' असे सांगत जेवण देण्यास नकार दिला. प्रवाशांनी तो निर्णय मान्य करून, आपत्कालीन परिस्थितीत महिलांना व लहान मुलाला प्रसाधनगृह वापरण्याची परवानगी द्यावी, अशी नम्र विनंती केली. त्यावर संबंधित कर्मचाऱ्याने महिलांशी अरेरावीची भाषा वापरत, जोरजोरात वाद घालत प्रसाधनगृह वापरण्यास थेट मनाई केली. राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या आस्थापनांनी **(उर्वरित वृत्त पान २ वर)**

## विद्यापीठीय समानतेला विषमतावाद्यांचा अपशकून

विद्यापीठ अनुदान आयोगाने अधिसूचित केलेले ''उच्च शिक्षण संस्थांमध्ये समानता वाढवण्यासाठीचे नियम, २०२६'' हे भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण हस्तक्षेप आहे. हे नियमन केवळ शैक्षणिक कॅम्पसमध्ये प्रचलित असलेल्या जात, धर्म, लिंग, अपंगत्व आणि सामाजिक पार्श्वभूमीवर आधारित भेदभावाला संबोधित करत नाही तर समान संधी, प्रतिष्ठा आणि न्याय या संवैधानिक मूल्यांना संस्थात्मक करण्याचा प्रयत्न करते. विडंबना म्हणजे, देशभरातील विद्यापीठांमधून भेदभाव, छळ आणि आत्महत्यांच्या चिंताजनक बातम्या येत असताना, या नियमनामुळे उच्च जातीच्या समुदायाच्या मोठ्या वर्गात, विशेषतः उच्च जातीच्या समुदायात अस्वस्थता, संताप आणि विरोध निर्माण झाला आहे.

**विद्यापीठांमध्ये भेदभाव: आकडेवारी आणि वास्तव –**

युजीसी, सामाजिक न्याय मंत्रालय आणि स्वतंत्र संशोधन संस्थांच्या अहवालांमध्ये सातत्याने असे सूचित केले आहे की उच्च शिक्षण संस्था जातीय-तटस्थ नाहीत. अनुसूचित जाती/जमाती आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, संशोधन मार्गदर्शनात भेदभाव, शाब्दिक गैरवापर, सामाजिक बहिष्कार, अंतर्गत तक्रार यंत्रणेची निष्क्रियता आणि आरक्षणाला ''अपात्रता'' असे समीकरण करण्याची प्रवृत्ती आयआयटी, आयआयएम, केंद्रीय विद्यापीठे आणि राज्य विद्यापीठांमध्ये वारंवार समोर आली आहे. रोहित वेमुला ते पायल तडवी यांच्यापर्यंत, या केवळ वैयक्तिक शोकांतिका नाहीत तर संस्थात्मक हिंसाचाराचे पुरावे आहेत. यूजीसीकडे उपलब्ध तक्रारींच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की भेदभाव हा अपवाद नाही तर एक संरचनात्मक समस्या आहे.

**समानता नियम २०२६: बदलण्याचा प्रयत्न काय आहे?**

यूजीसीचे हे नियमन, प्रथमच, ''समानता'' केवळ नैतिक अत्यावश्यकता म्हणून नव्हे तर एक नियामक बंधन म्हणून स्थापित करते. त्यात अशा तरतुदींचा समावेश आहे: समान संधी केंद्र, समानता समिती, २४७ समानता हेल्पलाइन, तक्रारदाराच्या ओळखीची गोपनीयता, संस्थेच्या प्रमुखांविरुद्ध तक्रारींची तरतूद आणि यूजीसी अनुदान, अभ्यासक्रम आणि अगदी अनुपालन न करण्यासाठी मान्यता यांच्याविरुद्ध कारवाई. हे स्पष्ट आहे की हे नियमन विद्यापीठ प्रशासनांना पहिल्यांदाच जबाबदार ठरवते आणि हेच अस्वस्थतेचे मूळ आहे.

**उच्चवर्णीय समाजातील अशांतता : खरी भीती काय आहे?**

प्रश्न विचारला पाहिजे की समानता, समान संधी आणि भेदभाव न करणे यासारख्या संवैधानिक मूल्यांमुळे एक विशिष्ट वर्ग इतका अस्वस्थ का आहे? प्रत्यक्षात, हा निषेध समानतेच्या तत्त्वाबद्दल नाही तर विशेषाधिकारांच्या क्षयीकरणाबद्दल आहे. उच्चवर्णीयांनी ऐतिहासिकदृष्ट्या विद्यापीठ प्रशासन, प्राध्यापक निवड समित्या, शैक्षणिक मूल्यांकन आणि संशोधन प्रकाशन नेटवर्कवर वर्चस्व गाजवले आहे. समानता नियमन या अदृश्य शक्ती संरचनेला दृश्यमान आणि जबाबदार बनवते. म्हणूनच ते ''अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर हल्ला'', ''आरक्षण वाढवणे'' किंवा ''गुणधर्म दाबणे'' म्हणून सादर केले जात आहे.

**गैरकृत्यांना शिक्षा होईल का?**

उच्चवर्णीय समुदाय आणि त्याच्याशी संबंधित अनेक विद्यार्थी नेत्यांची चिंता अशी आहे की – मौखिक जातीयवादी टिप्पण्या देखील आता तक्रार मानल्या जाऊ शकतात. ''मार्गदर्शकाची इच्छा'' आता सर्वोपरि राहणार नाही. प्रशासकीय मौन आता गुन्हा मानले जाईल. ही भीती निराधार नाही, कारण नियमांमध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की जर भेदभाव सिद्ध झाला तर यूजीसी कठोर कारवाई करू शकते. याचा अर्थ असा की पूर्वी ''संस्थात्मक संस्कृती'' म्हणून झाकलेले गैरकृत्य आता दंडनीय असेल.

**हिंदू संहिता आणि संविधानाला ऐतिहासिक विरोध –**

हा विरोध नवीन नाही. जेव्हा हिंदू संहिता विधेयक मंजूर झाले, तेव्हा महिलांना मालमत्तेचे अधिकार देण्यात आले, आरक्षण लागू करण्यात आले आणि मंडल आयोग लागू करण्यात आला, तेव्हा असे म्हटले गेले की ''समाज तुटेल,'' ''गुणधर्म नाहीसा होईल,'' आणि ''परंपरा धोक्यात येईल.'' आज, समानता नियमनाच्या विरोधात तीच भाषा, तेच युक्तिवाद आणि तीच भीती पुनरावृत्ती होत आहे. खरं तर, हा विरोध संविधानाच्या मूलभूत तत्वज्ञानाच्या विरोधात आहे, जो समानता, न्याय आणि बंधुत्वाबद्दल बोलतो. हा एक प्रकारे संवैधानिक नैतिकतेविरुद्ध सांस्कृतिक वर्चस्व पुन्हा स्थापित करण्याचा प्रयत्न आहे.

**हे नियमन यशस्वी होईल का?**

जर विद्यापीठ प्रशासन राजकीय दबावापासून मुक्त असेल, विद्यापीठ प्रशासन पारदर्शक असेल, तक्रार समित्यांना खरे प्रतिनिधित्व असेल आणि पीडितांना संरक्षण आणि विश्वास असेल तरच हे नियमन यशस्वी होईल. हे खरे आहे की केवळ नियम लागू केल्याने सामाजिक संरचना बदलत नाहीत. परंतु नियमांशिवाय बदल सुरू होऊ शकत नाही हे देखील तितकेच खरे आहे. शेवटी, विद्यापीठ अनुदान आयोगाचे समानता नियमन, २०२६ हे क्रांतिकारी दस्तऐवज नाही तर संविधानाच्या कलम १४, १५ आणि २१ चे नैसर्गिक परिणाम आहे. त्याचा विरोध समानतेबद्दल नाही, तर शतकानुशतके विशिष्ट वर्गांवर वर्चस्व गाजवणाऱ्या असमानतेचे जतन करण्याबद्दल आहे. जर विद्यापीठांना खरोखरच ज्ञानाचे लोकशाही केंद्र बनायचे असेल, तर त्यांनी या नियमनाला ओझे नाही तर आत्मपरीक्षणाची संधी मानली पाहिजे. अन्यथा, इतिहास साक्षी आहे – समानतेला विरोध करणारी प्रत्येक रचना अखेर कोसळते.



**डॉ. संतोष पटेल**
नवी दिल्ली,
९८६८१५२८७४

**प्रासंगिक**

# लिंग गुणोत्तर सुधारण्यासाठी 'पीसीपीएनडीटी'ची कडक अंमलबजावणी करा- डॉ. आशिया

## तडजोड न करता कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश

**अहमदनगर । रयत समाचार**

मुलांच्या तुलनेत मुलींच्या लिंग गुणोत्तरात अपेक्षित सुधारणा साध्य करण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. यासाठी केवळ नियमित तपासण्यांवर विसंबून न राहता सापळा तपासणी आणि गुप्त माहितीवर आधारित लक्ष केंद्रीत कारवाई करण्यात यावी. संशयित आस्थापना व व्यक्तींविरोधात कोणतीही तडजोड न करता कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आरोग्य विभागाच्या विविध योजनांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, अशासकीय सदस्य सुधा कांकरिया, विधी समुपदेशक ॲड. सारिका सुरासे यांच्यासह संबंधित विभागप्रमुख उपस्थित होते. डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यातील मुलींच्या लिंग गुणोत्तरात ठोस सुधारणा होण्यासाठी आरोग्य विभागाने अधिक गांभीर्याने व दक्षतेने काम करणे गरजेचे आहे. गर्भधारणेपासून जन्मानंतरपर्यंत प्रत्येक मुलीची नोंद व निरीक्षण काटेकोरपणे करण्यात यावे. ज्या तालुक्यांमध्ये



लिंग गुणोत्तर कमी आहे, त्या भागांवर विशेष लक्ष केंद्रीत करून तालुका, ग्राम व जिल्हास्तरीय यंत्रणेने समन्वयाने काम करावे, असे निर्देशही त्यांनी दिले. ज्या तालुक्यांमध्ये जन्म व मृत्यू नोंदींचे प्रमाण कमी आहे, तेथे प्रलंबित नोंदी तातडीने पूर्ण कराव्यात. संबंधित अधिकाऱ्यांनी कारणांचा सखोल अभ्यास करून सुधारात्मक उपाययोजना राबवाव्यात व पुढील कालावधीत नोंदणीचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढेल, याची जबाबदारी निश्चित करावी, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. तसेच क्षयरोग निर्मूलनाच्या दृष्टीने संशयित रुग्णांचे लवकर निदान व तातडीने उपचार सुरू करणे आवश्यक असल्याचे सांगत, तपासण्यांची संख्या वाढवण्याचे निर्देश देण्यात आले. सकारात्मक रुग्णांची नोंद 'निक्षय' पोर्टलवर अनिवार्यपणे करावी, असेही त्यांनी सांगितले. प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी नोंदणीचे प्रमाण वाढवण्यावर भर देण्यात आला. प्रत्येक अंगणवाडी सेविकेला दरमहा नोंदणीचे उद्दिष्ट देऊन किमान २५० नोंदणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यासाठी आरोग्य मित्रांची मदत घ्यावी व एकही लाभार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. बैठकीत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. घोगरे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नागरगोजे यांनी आरोग्य विभागाच्या योजनांची सविस्तर माहिती सादर केली. बैठकीस तालुका आरोग्य अधिकारी व संबंधित विभागप्रमुख दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.



# मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटीत प्रजासत्ताक दिन उत्साहात

**अहमदनगर । रयत समाचार**

मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटी संचलित सावित्रीबाई फुले उर्दू प्राथमिक कन्या शाळा, मौलाना आझाद उर्दू मुलींचे हायस्कूल, मदर तेरेसा उर्दू ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स फॉर गर्ल्स, मासुमिया डी.एल.एड. कॉलेज (उर्दू) व मासुमिया शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वाबळे कॉलनी, मुकुंदनगर, अहिल्यानगर येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे संस्थापक व प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ. शेख अब्दुस सलाम अब्दुल अजीज यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रा. डॉ. शेख अब्दुस सलाम यांनी मनोगत व्यक्त करताना प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व, धार्मिक एकात्मता, राष्ट्रीय अखंडता तसेच भारतीय संविधानाबाबत सखोल व सविस्तर विचार मांडले. कार्यक्रमास अरुणा आसिफ अली सामाजिक व शैक्षणिक महिला मंडळाच्या अध्यक्षा शेख फरीदा भाभी, मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष शेख लाल हुसैन, सदस्य मिर्झा नवेद गयासबेग, शेख शरफोद्दीन जैनोद्दीन, शेख अलाउद्दीन महेमुद व इतर सभासद तसेच मुख्याध्यापक नौशाद सय्यद व सर्व शिक्षकवृंद, मुख्याध्यापिका फरहाना सय्यद व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, मदर तेरेसा उर्दू ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापकवृंद, मासुमिया डी.एल.एड. कॉलेज (उर्दू) व मासुमिया शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापकवृंद उपस्थित होते. प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थिनींनी विविध गुणदर्शनपर कार्यक्रम सादर केले. सूत्रसंचालन बहार सय्यद यांनी केले तर कार्यक्रमाचे नियोजन नाजेमा जुल्फेकार यांनी केले. शेख अब्दुल हसीब यांनी आभार मानले.



# दारुल उलूम रज़ा ए मेहबूबमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**अहमदनगर । आबीद खान**

दारुल उलूम रज़ा ए मेहबूब या शैक्षणिक संस्थेत भारताचा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहपूर्ण व देशभक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीताच्या सुमधुर स्वरांत संपूर्ण परिसर देशप्रेमाच्या भावनेने भारावून गेला. कार्यक्रमात मदरशातील विद्यार्थी स्वच्छ गणवेशात शिस्तबद्ध रांगेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांनी सादर केलेली देशभक्तीपर गीतं, कवितांचे सादरीकरण व प्रेरणादायी घोषणांमुळे वातावरण अधिकच भारदस्त झाले. यावेळी मुफ्ती शाहजहां कादरी रज़वी, मुफ्ती सबर नवाज़ व मौलाना अब्दुल मन्नान इकबाल यांनी आपल्या मनोगतात देशावर प्रेम करणे ही प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी असून शिक्षणासोबत राष्ट्रसेवेची भावना रुजवणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी धार्मिक शिक्षणासोबत आधुनिक शिक्षणातही प्रगती करून समाजाच्या उन्नतीस हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले. प्रमुख पाहुण्यांनी संविधानाचे महत्त्व, स्वातंत्र्यसैनिकांचे बलिदान व लोकशाही मूल्यांची जपणूक करण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगत सामाजिक सलोखा, एकता व शांततेचा संदेश दिला. यावेळी नवनिर्वाचित नगरसेवक हाजी शहबाज़ सय्यद, नगरसेवक शेख खालिदभाई, माजी नगरसेवक आसिफ सुल्तान, सामाजिक कार्यकर्ते नेत्रमित्र राजूभाई शेख, हाजी मणियार, हाजी सय्यद रियाज़, युवा पुरस्कार विजेते अन्वर सय्यद, काँग्रेसचे पदाधिकारी मोहम्मद मुबीन शेख, मतीन शेख केडगाववाले, खत्मे कादरीया ग्रुपचे सदस्य तसेच मुकुंदनगर भागातील ज्येष्ठ नागरिक व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार हज़रत हाजी बाबर चाँद कादरी रज़वी रब्बानी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे विश्वस्त खलिफा ए मन्सूरे मिल्लत हाजी शेख बाबर चाँद कादरी रज़वी मेहबूबी रब्बानी, शेख नदीमभाई कादरी रज़वी, शेख अब्दुल कादिर, शेख रफिक केडगाव, सय्यद अलीमुद्दीन, शेख तहनूर कादरी, मौलाना हाफीज़ ओ कारी शाहीद कादरी रज़वी, मौलाना फय्याज़ साहब, कारी इम्रान रज़ा साहब, मुन्शी मामू, नदीम रज़ा, अदीब शेख, आफताब शेख, अरबाज़ बागबान, सय्यद अबूज़र, फरीद बागवान, सय्यद मुख्तार, मुज़म्मील बाबर, रेहान रिक्षावाले आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# संविधानाचा अभ्यास धर्मग्रंथाप्रमाणे करावा–डोके

**अहमदनगर । विजय मते**

प्रजासत्ताकाचा हा उदय केवळ स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुत्वासाठी नव्हता, तर एक राष्ट्र म्हणून लोककल्याण व प्रगतीचा मार्ग ठरवणारा होता. भारतीय संविधानाने सर्वसामान्य व्यक्तीलाही देशाच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचण्याची संधी दिली आहे. संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते लोकशाही म्हणजे केवळ मतदानाचा हक्क नव्हे, तर आर्थिक व सामाजिक क्रांती घडविण्याचे साधन आहे.

त्यामुळे संविधानाचा अभ्यास हा आपल्या धर्मग्रंथाप्रमाणे करावा, असे प्रतिपादन लक्ष्मीबाई शांताराम डोके समाज विकास प्रतिष्ठानच्या सचिव आशादेवी डोके यांनी केले. निर्मल नगर येथील सौ. लक्ष्मीबाई शांताराम डोके विद्यालयात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी मीनाक्षी पांडुळे, संस्थेच्या सचिव आशादेवी डोके, अभिषेक खामकर, किरण जाधव उपस्थित होते. प्रमुख पाहुणे मीनाक्षी पांडुळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात आशादेवी डोके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत संविधान व प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व विशद केले. सर्वांच्या विकासासाठी संविधानाचा अभ्यास धर्मग्रंथाप्रमाणे करावा, असे आवाहन त्यांनी केले. मीनाक्षी पांडुळे यांनीही विद्यार्थ्यांना भारतीय प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व पटवून दिले. यावेळी विद्यार्थ्यांनी कवायत संकलन, सांस्कृतिक गीते व देशभक्तीपर भाषणे सादर करून उपस्थित मान्यवरांची मने जिंकली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे, शिक्षिका सुजाता कर्डिले, मंजू नवगिरे, आशा धामणे, राणी राऊत बर्वे मॅडम, जगदाळे सर, श्री. बिडवे, श्री. शेलार, श्री. सोनवणे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन मंदाकिनी पांडुळे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक संभाजी पवार यांनी मानले.



# रहेमत सुलतान फाऊंडेशनकडून प्रजासत्ताक दिन साजरा

**अहमदनगर । आबीद खान**

स्वातंत्र्यसैनिक सुलतान तांबटकर यांच्या प्रेरणेने रहेमत सुलतान फाऊंडेशनचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर यांनी फाऊंडेशनच्या माध्यमातून झेंडावंदनाच्या नियमित कार्यक्रमास सुरुवात केली.

यावर्षी प्रजासत्ताक दिनानिमित्त रहेमत सुलतान फाऊंडेशनतर्फे चारुता शिवकुमार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी भावना केदार, प्रा. डॉ. महेबुब सय्यद, इंजि. अभिजीत वाघ, आसिफ दुलेखान, भैरवनाथ वाकळे, आरिफ सय्यद, संध्याताई मेढे, डॉ. विवेकानंद कंगे, राजा भैया, महानुर सर, कलीम शेख, संजय भिंगारदिवे, समी शेख, तन्वीर चष्मावाला, शफकत सय्यद, आदित्य वडवणीकर, सईद खान, वसीम शेख, अबरार शेख, जावेद मास्टर आदी उपस्थित होते. यावेळी चारुता शिवकुमार यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त आपल्या विचारांनी उपस्थितांना संबोधित केले. कार्यक्रमानंतर सर्वांना मिठाईचे वाटप करण्यात आले.

# महात्मा फुले शाळेत २६ जानेवारी निमित्त मिठाई वाटप

**अहमदनगर । रयत समाचार**

येथील महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या जुनी १७ नंबर शाळा म्हणजेच महात्मा फुले शाळेत २६ जानेवारी निमित्त मिठाईसह पोह्याचे वाटप करण्यात आले. २६ जानेवारी हा संविधान दिवस भारतभर नव्हे तर जगभर साजरा होतो. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा या दिवशी जागर होत असतो. झेंडावंदनासाठी सर्व एकत्र होतात. नव्या पिढीला संविधान समजावे, विद्यार्थ्यांमधे भारतीय राज्यघटनेबाबत जागृती व्हावी यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. शिवसेनेचे धनंजय गोलवड यांच्या प्रमुख




उपस्थितीत दिपक नेटके, जयंत भिंगारदिवे, सुभाष भिंगारदिवे, अजय नेटके, सौरभ भिंगारदिवे, सागर भिंगारदिवे, मयुर भिंगारदिवे, सोनु बारस्कर, करण गुंजाळ, दत्ता गोलवड, गोरख बनकर आदी माजी विद्यार्थी मंडळींनी विद्यार्थ्यांना मिठाई वितरीत केली. शिक्षकांनी या उपक्रमाविषयी आभार व्यक्त केले.

# शिक्षक हे दिव्यांग विद्यार्थ्यांचे खरे आधारस्तंभ- अग्रवाल

## मूकबधिर विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**अहमदनगर । समीर मन्यार**

सावेडी येथील अपंग संजीवनी सोसायटीच्या मूकबधिर विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी झेवाना कंपनीच्या संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी सुश्री दीक्षा अग्रवाल/भावले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी बोलताना अग्रवाल म्हणाल्या की, दिव्यांग विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. योग्य वेळी योग्य शिक्षण दिल्यास दिव्यांग विद्यार्थी समाजाचा एक महत्त्वाचा घटक ठरू शकतात. सर्वसामान्य विद्यार्थ्यांपेक्षा त्यांची आकलनशक्ती अधिक असून त्यांना केवळ साथ व संधी देण्याची आवश्यकता आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या आयुष्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून शिक्षक हे त्यांच्या आयुष्याचे खरे आधारस्तंभ आहेत. कार्यक्रमात संस्थेच्या ज्येष्ठ संचालिका विद्या भावले यांनी संस्थेच्या कार्याची माहिती देताना सांगितले की, विद्यालयामध्ये शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. यामुळे विद्यार्थी बाहेर पडल्यावर कोणावरही अवलंबून न राहता स्वतःच्या पायावर उभे राहून कुटुंबाचा आधार बनतात. कमिन्स कंपनीचे एच.आर. सतीश फडताळे यांनी विद्यालयाच्या कार्याचे कौतुक करत समाजातील सर्व घटकांनी दिव्यांगांच्या पाठीशी उभे राहून त्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमातून स्वराज्यरक्षक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित सादरीकरण करत राष्ट्रभक्तीचा प्रभावी संदेश दिला. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या पालकांनीही आपले मनोगत व्यक्त करत विद्यालय व शिक्षकांचे आभार मानले. कार्यक्रमास विद्यालयाचे चेअरमन मधुकर भावले, ज्येष्ठ संचालिका विद्या भावले, राहुल भावले, मुख्याध्यापक डी. के. जगधने, मान्यवर पाहुणे, शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेवजी भांड यांनी केले तर आभार मुख्याध्यापक डी. के. जगधने यांनी मानले.



# निमगाव वाघा येथे प्रजासत्ताक दिन साजरा

**नगर तालुका । रयत समाचार**

नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी तिरंगी झेंडे घेऊन 'भारत माता की जय'च्या घोषणांतून प्रभातफेरी काढत सार्वजनिक स्वच्छतेचा जागर केला.

ग्रामस्थांनी प्रभातफेरीचे स्वागत रांगोळ्यांनी केले. विद्यार्थ्यांनी लावणी, लेझीम पथक व देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. सकाळी नवनाथ विद्यालय, शहीद स्मारक (गोरख नाना जाधव), ग्रामपंचायत कार्यालय व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत अनुक्रमे सेवानिवृत्त मेजर राजेंद्र फलके, किसन गहिले, उपसरपंच किरण जाधव व सरपंच उज्वलाताई कापसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम व संविधानाचे सामुदायिक वाचन झाले. सरपंच उज्वलाताई कापसे यांना राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ नारी शक्ती पुरस्कार मिळाल्याबद्दल तसेच ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्या जिल्हाध्यक्षपदी निवडीबद्दल नागरी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास ग्रामपंचायत अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

# महामार्गावर माणुसकीचा पराभव

## महिलांना व चिमुकल्याला प्रसाधनगृह वापरण्यास नकार

प्रवाशांनाविशेषतः महिला, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांनाप्रसाधनगृहासारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवू नये, हे शासकीय नियम स्पष्ट असतानाही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले. हा प्रकार केवळ नियमभंग नसून महिला व बालहक्कांची उघड पायमल्ली आहे आणि तो मानवी प्रतिष्ठेवर केलेला थेट आघात मानला जात आहे. प्रवाशांच्या सोयी, सुरक्षितता आणि सन्मानासाठी जबाबदार असलेले राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, स्थानिक प्रशासन व संबंधित यंत्रणा नेमक्या कुठे आहेत? महामार्गालगत सुरू असलेल्या हॉटेल्सवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी कोणाची, आणि ती जबाबदारी प्रत्यक्षात पार पाडली जाते की नाही, असा थेट व संतप्त सवाल या घटनेमुळे उपस्थित झाला आहे. नियम अस्तित्वात असतील, तर त्यांची अंमलबजावणी का होत नाही, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. सदर प्रकरणी संबंधित हॉटेलवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, तसेच भविष्यात कोणत्याही महिलेला, बालकाला किंवा ज्येष्ठ नागरिकाला अशा अमानवी वागणुकीला सामोरे जावे लागू नये, यासाठी महामार्गालगतच्या सर्व आस्थापनांना स्पष्ट व सक्त निर्देश देण्यात यावेत, अशी जोरदार मागणी विजय अंधारे यांच्या वतीने करण्यात आली आहे. माणुसकीऐवजी मुजोरी सहन केली जाणार असेल, तर महामार्ग प्रवाशांसाठी सुरक्षित कसा राहील, हा प्रश्न आता प्रशासनासमोर ठामपणे उभा ठाकला आहे.

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद–विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# ग्रामपंचायतीच्या मनमानीविरोधात अमोलिक यांचे उपोषण सुरू



**ता. १९ जानेवारी २०२६ च्या पत्रानुसार २६ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या ग्रामसभेत सर्व विषयांचे वाचन करून त्यावर निर्णय घेतला जाईल, असे लेखी देण्यात आले होते. मात्र ग्रामसभेत असा कोणताही विषय घेण्यात आला नाही. त्यामुळे आपल्या विषयांकडे दुर्लक्ष झाल्याने ग्रामपंचायत बेलापूरच्या मनमानी कारभाराविरोधात पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्या कार्यालयासमोर उपोषणास बसल्याचे अमोलिक यांनी सांगितले.**

**बेलापूर । शफीक बागवान**

बेलापूर ऐनतपूर गावातील घरकुल व जमीन शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार वाटप करावे, या मागणीसाठी श्रीरामपूर पंचायत समितीसमोर बेलापूर ग्रामपंचायतीचे सदस्य रमेश अमोलिक यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणस्थळी अमोलिक म्हणाले की, २१ जानेवारी २०२६ रोजी बेलापूर ग्रामपंचायतीसमोर आपण उपोषण केले होते. ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामविकास अधिकारी यांनी लेखी पत्र दिल्यानंतर उपोषण सोडण्यात आले. २३ सप्टेंबर २०२५ रोजीच्या जा.क्र. २९४/२०२५ नुसार घरकुल योजनेच्या भूखंडाचे रेखांकन नकाशे मंजुरीसाठी नगर रचना विभागाकडे पाठवले असून ते अंतिम टप्प्यात असल्याचे पत्रात नमूद आहे. ग्रामविकास अधिकाऱ्यांनी याबाबत लेखी कळविले होते. अमोलिक म्हणाले की, खाजगी रेखांकनावर जमीन वाटप करू नये. शासनाच्या नगर रचना विभागामार्फत मंजूर झालेले रेखांकनच ग्राह्य धरावे. शासनाने दिलेल्या घरकुलसाठीच्या जमिनीचे रेखांकन शासन नियमांनुसार झाले पाहिजे व सर्व लाभार्थ्यांना लकी ड्रॉ (ईश्वर चिठ्ठी) पद्धतीने जमीन वाटप करावे. जे लाभार्थी घरकुल कॉलनीत घर न बांधता स्वतः बांधकाम करू इच्छित आहेत, त्यांना जमीन वाटप करावे. तसेच शासनाने घरकुल लाभार्थ्यांसाठी जाहीर केलेल्या ५ ब्रास मोफत वाळूपैकी किती लाभार्थ्यांना वाळू देण्यात आली, याचा खुलासा करावा, या मागणीसाठी आपण उपोषणास बसलो असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, रमेश अमोलिक यांच्या उपोषणास भीमाशक्ती संघटनेचे सचिव अल्ताफ शेख, विजय शेलार, जावेद शेख, बेलापूर ग्रामपंचायतीचे ज्येष्ठ विद्यमान सदस्य तसेच माजी सरपंच महेंद्र साळवी, करिम शेख, ग्रामपंचायत सदस्य व माजी सरपंच भरत साळुंके, विद्यमान सदस्य रवींद्र खटोड, ऐनतपूर सोसायटीचे चेअरमन चंद्रकांत पा. नाईक, महेश नवले यांनी भेट देत पाठिंबा दिला आहे.

# संतोष भोसले यांना 'संविधान इनोवेटर्स पुरस्कार'

**मी अशा परिस्थितीतून आलो आहे जिथे स्वप्न पाहणंही कठीण होतं. अपमान, अडचणी आणि नाकारलेल्या संधी यांमधूनच मला पुढे जावं लागलं. त्या प्रत्येक टप्प्यावर माझ्या हातात एकच शस्त्र होतं भारतीय संविधान.**

**–संतोष भोसले**

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

''संविधान वाचणं महत्त्वाचं आहे, पण संविधान जगणं त्याहूनही महत्त्वाचं आहे,'' असे ठाम मत व्यक्त करत आदिवासी कार्यकर्ता संतोष भोसले यांनी 'संविधान इनोवेटर्स पुरस्कार २०२६' स्वीकारला. राष्ट्रीय पातळीवरील 'वी द पीपल' अभियानाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात गुरगाव, गुजरात व दिल्ली येथे हा सन्मान प्रदान करण्यात आला.




सामाजिक न्याय, आदिवासी हक्कांचे संरक्षण, संविधानिक मूल्यांचा प्रचार तसेच तळागाळातील वंचित घटकांसाठी सातत्याने केलेल्या भरीव कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला. संविधानानेच माणसाला हक्क, सन्मान आणि आपला आवाज दिला, असे सांगत त्यांनी स्पष्ट केले की त्यांचा संघर्ष सूडासाठी नव्हे, तर परिवर्तनासाठी आहे; सत्तेसाठी नव्हे, तर माणुसकीसाठी आहे. ''आजचा हा पुरस्कार माझ्या यशापेक्षा माझ्या जबाबदारीची जाणीव करून देतो. जोपर्यंत समाजात एकही माणूस अन्याय सहन करतो, तोपर्यंत संविधानावर विश्वास ठेवणारा माणूस शांत बसू शकत नाही,'' असे मत त्यांनी व्यक्त केले. संतोष भोसले यांच्या कार्यामुळे अनेक तरुणांना संविधानिक मार्गाने अन्यायाविरुद्ध लढा देण्याची नवी प्रेरणा मिळत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. हा पुरस्कार केवळ एका व्यक्तीचा गौरव नसून, संविधानिक मूल्यांवर आधारित सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचा सन्मान असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# हळदी-कुंकूच्या निमित्ताने गडाखांचे शक्तीप्रदर्शन?

## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीची चाचपणी

**नेवासा । विजय खंडागळे**

मकर संक्रांतीच्या सणाचे औचित्य साधून माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या निवासस्थानी पारंपरिक पद्धतीने हळदी-कुंकू कार्यक्रम सकाळपासून दिवसभर मोठ्या उत्साहात पार पडला. दरम्यान, हा कार्यक्रम भावी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची नांदी तर नाही ना, अशी चर्चा सुरू आहे. या कार्यक्रमाला गावातील तसेच तालुका परिसरातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत गडाख गटाला बळ दिल्याची चर्चा रंगली असून, यामुळे विरोधकांनी धसका घेतल्याचे बोलले जात आहे. कार्यक्रमास पंचायत समितीच्या माजी सभापती व महिला नेत्या सुनीता गडाख, उषा गडाख, जया गडाख, सरोज गडाख यांच्यासह कुटुंबातील सदस्य प्रमुख उपस्थित होते. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर महिलांचा तिळगूळ, भेटवस्तू व स्नेहभोजन देऊन सन्मान करण्यात आला. डेंटल हॉस्पिटल व पंडित हॉस्पिटल यांच्या वतीने स्त्रीरोग निदान आरोग्य शिबिर घेण्यात आले असून महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

हळदी-कुंकू कार्यक्रमासोबत आर.जे. प्रसन्न पाठक यांच्या सहभागातून 'फणी' हा खेळ घेण्यात आला व बक्षीस वाटप करण्यात आले. माजी सभापती सुनीता गडाख म्हणाल्या की, या प्रतिसादामुळे महिलांमधील आपुलकी, एकोपा व सामाजिक सलोखा अधिक दृढ झाला आहे.



संसाराचा गाडा हाकताना महिलांवरील ताण-तणाव कमी करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले तसेच विविध प्रश्नांवर मोलाचे विचार मांडण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिला आयोजकांचे जया गडाख यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# मूकरेषा मनपटलावर कोरल्या गेल्या- राजेश शहा



**आपले आई-वडील दोघेही मूकबधिर असतानाही त्यांनी कधी हार न मानता यशासाठी प्रयत्न केल्याचा अभिमान व्यक्त केला. विद्यालयाच्या मार्गदर्शनामुळेच हे शक्य झाले असल्याचे सांगत त्यांनी भावना व्यक्त करताना उपस्थितांच्या डोळ्यात पाणी आणले.**

**–अल्फिजा अकिल शेख**

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त माजी मूकबधिर विद्यार्थी-विद्यार्थिनींचा मेळावा घेणे म्हणजे दिव्यांगांच्या आयुष्याला दिशा देण्याचे मौलिक कार्य असल्याचे प्रतिपादन रोटरी क्लबचे सदस्य राजेश शहा यांनी केले. मूकबधिर विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेल्या मुक रेषांतील भावना रंगरेषांच्या माध्यमातून मनपटलावर कोरल्या गेल्या असून शालेय परिसर सुशोभीत केला जाईल, असे त्यांनी ध्वजारोहणप्रसंगी सांगितले. अकिल शेख यांच्या कन्येने व्यक्त केलेल्या भावनांनी उपस्थितांचे डोळे पाणावले. मुलांची प्रगती हेच शाळेचे खरे यश असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. विद्यालयातील सामाजिक अधिकारी संजय साळवे यांनी मूकबधिर विद्यार्थ्यांच्या नोकरीसाठी विशेष प्रयत्न करून त्यांचे सामाजिक पुनर्वसन केल्याबद्दल कौतुक करण्यात आले. माजी विद्यार्थ्यांसाठी रोटरी क्लब विशेष प्रकल्प राबवून छोटे व्यवसाय निर्माण करून रोजगार उपलब्ध करून देईल, अशी ग्वाही रोटरी क्लबचे अध्यक्ष उद्धव तांबोळी यांनी अध्यक्षस्थानावरून दिली. याप्रसंगी माजी विद्यार्थी गोविंद सांगळे यांनी मूकबधिर विद्यार्थ्यांनी न्यूनगंड न बाळगता जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करावेत, असे सांगितले. योगेश रानडे यांनी शासकीय नोकरी मिळविण्याचा अनुभव कथन केला, तर अक्षय गलांडे यांनी हैदराबाद येथे घेत असलेल्या उच्च शिक्षणाची माहिती दिली. देवेंद्र जगदाळे यांनी इंदोर येथे साईन लँग्वेज प्रशिक्षण घेत असल्याची माहिती देत या शाळेमुळेच आपण घडल्याचे सांगितले. मुकिंद गाडेकर यांचे पुनर्वसन विद्यालयाने केल्याचे नमूद करण्यात आले. तसेच अनेक माजी विद्यार्थ्यांचे विवाह लावून देण्यात आले असून त्या जोडप्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास रोटरी एज्युकेशन ट्रस्टचे सचिव नारायणभाई पटेल, विश्वस्त ऋषिकेश बनकर, उल्हास धुमाळ, सुरडकर काका, राजेश कुंदे, सुहास चुडीवाल, डॉ. अजित घोगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दिव्यांग तक्रार निवारण अधिकारी संजय साळवे यांनी माजी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक समस्यांचे विश्लेषण करून दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाच्या विशेष शाळांबाबतच्या धोरणाची माहिती दिली. यावेळी मूकबधिर विद्यार्थ्यांनी संगीताच्या तालावर कवायत सादर केली. माजी विद्यार्थी संघाकडून शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय साळवे यांनी केले तर मान्यवरांचे स्वागत मुख्याध्यापक संतोष जोशी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुकिंद गाडेकर, रामदास रासकर, अतुल साळुंके, कैलास बनकर, मंगेश सालपे, कौशल्या जाधव, सुरज गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

# आदर्श विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

## आवारे प्रतिष्ठानकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**नगर तालुका । रयत समाचार**

आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दरवर्षीप्रमाणे यंदाही प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त श्री सद्गुरु साहेबराव आवारे प्रतिष्ठानच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व शालेय साहित्य देऊन गौरव करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री सद्गुरु साहेबराव आवारे प्रतिष्ठानचे अध्यक्ष नवनाथ मगर होते. प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. विनायक तोडमल, अश्विनी मगर, माजी सैनिक ज्ञानदेव घोरपडे, शाळेचे मुख्याध्यापक जगन्नाथ जगदाळे, सर्व शिक्षकवृंद तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना ॲड. विनायक तोडमल म्हणाले की, विद्यार्थ्यांनी केवळ गुणांसाठी नव्हे तर ज्ञानासाठी अभ्यास केला पाहिजे. शिस्त, परिश्रम व सातत्य या तीन गोष्टी अंगीकारल्यास यश नक्की मिळते. देशाचा चांगला नागरिक होण्यासाठी शिक्षणासोबत मूल्यांची जोपासना करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शाळेच्या वतीने मुख्याध्यापक जगन्नाथ जगदाळे यांनी श्री सद्गुरु साहेबराव आवारे प्रतिष्ठानचे आभार मानत सांगितले की, प्रतिष्ठान दरवर्षी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मोलाचे योगदान देत आहे. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, आत्मविश्वास व स्पर्धात्मक वृत्ती निर्माण होते. या कार्यक्रमास पालक सुभाष आढाव, वैशाली मगर, रंजना घोरपडे, रामदास ससे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**कार्यक्रमात दारकुंडे गायत्री नवनाथ, प्रज्वल नवनाथ मगर, आढाव चैतन्य सुभाष, कराळे प्रज्वल नवनाथ, गवते शाश्वती राजेंद्र, काळे श्वेता सखाराम या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.**

## संगमनेरच्या कलारत्नाचा पद्मश्री पुरस्काराने गौरव

# लोकनाट्य तमाशा क्षेत्रातील योगदानासाठी रघुवीर खेडकरांचा सन्मान

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारने २०२६ च्या पद्म पुरस्कारांची घोषणा केली असून, लोकनाट्य तमाशा क्षेत्रातील योगदानासाठी संगमनेरचे ज्येष्ठ कलाकार रघुवीर खेडकर यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. यासोबतच कृषी क्षेत्रातील योगदानासाठी श्रीरंग लाड तसेच पालघर जिल्ह्यातील वारली संगीतकार भिकल्या लाडक्या ढिंका आणि आर्मिंदा फर्नांडीस यांनाही पद्म पुरस्कार जाहीर झाला आहे. केंद्र सरकारने यंदा एकूण ४५ मान्यवरांची पद्म पुरस्कारासाठी निवड केली असून, त्यामध्ये महाराष्ट्रातील चार भूमीपुत्रांचा समावेश आहे. लोककला व लोकनाट्य जपण्यासाठी दिलेल्या बहुमूल्य योगदानाची दखल म्हणून रघुवीर खेडकर यांचा पद्मश्री पुरस्कारासाठी समावेश करण्यात आला आहे. दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांच्या वेळी कांताबाई सातारकर व रघुवीर खेडकर यांना तमाशा सादर करण्याचा बहुमान मिळाला होता.



संगमनेर ही लोककलावंतांची भूमी म्हणून ओळखली जाते. कवी अनंत फंदी, आद्यनृत्यांगणा पवळा भालेराव हिवरगावकर, लोकशाहीर विठ्ठल उमप, लावणी कलावंत गुलाबबाई संगमनेरकर व स्व. कांताबाई सातारकर यांचा समृद्ध वारसा या भूमीला लाभला आहे. संगमनेरच्या या कलारत्नाला पद्मश्री पुरस्कार जाहीर होणे हे तमाशा लोककला क्षेत्रासाठी सुवर्णक्षण मानले जात असून, या घोषणेमुळे संगमनेर तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी रघुवीर खेडकर यांचे अभिनंदन करून शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

# संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजच्या सात विद्यार्थ्यांना नोकरी



**कोपरगाव । किसन पवार**

संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये बी.टेकच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या सात विद्यार्थ्यांना परीक्षेचा निकाल लागण्यापूर्वीच ब्रिटिश पेट्रोलियम (बीपी) बिझिनेस सोल्युशन्स या तेल व वायू क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपनीत नोकरीची संधी मिळाली आहे. महाविद्यालयातील सॅप प्रमाणित कोर्स व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हे यश मिळाल्याची माहिती महाविद्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजचा ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग उद्योगजगताशी सातत्याने संपर्कात असून विद्यार्थ्यांना तांत्रिक ज्ञानासोबतच सॉफ्ट स्किल्स, मुलाखत कौशल्ये व आधुनिक सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण दिले जाते. विशेषतः सॅप प्रमाणित कोर्समुळे नामांकित कंपन्यांच्या कठीण निवड प्रक्रियेत विद्यार्थ्यांना यश मिळवणे सुलभ होत असल्याचा अनुभव आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यासाठी महाविद्यालयाने सॅप या बहुराष्ट्रीय सॉफ्टवेअर कंपनीशी सामंजस्य करार केला आहे. पदवी शिक्षण सुरू असतानाच सॅप प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ व खर्च दोन्हीची बचत होत आहे. ब्रिटिश पेट्रोलियम बिझिनेस सोल्युशन्समध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा अथर्व राधाकिसन सानप, इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरिंगच्या अश्विनी विजय गोडगे, ऋतुजा भाऊसाहेब हर्दे, अर्पिता गणेश रहाणे, रविशा निळकंठ शिंदे, रविशा रवी हलवाई तसेच इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगची धनश्री राजेंद्र मरकड यांचा समावेश आहे. संस्थेचे अध्यक्ष नितिन कोल्हे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले. कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. एम. व्ही. नागरहल्ली, डॉ. विशाल तिडके, डॉ. प्रसाद पटारे, डॉ. एन. डी. कपाले आदी उपस्थित होते.

### आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण झाले

**मी पाथर्डी तालुक्यातील शेतकऱ्याची मुलगी आहे. माझ्या बहिणीने संजीवनी फार्मसी महाविद्यालयातून पदवी घेतल्यामुळे संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाबद्दल मला माहिती होती. चांगल्या कंपनीत चांगल्या पगाराची नोकरी मिळवण्याचे माझे ध्येय आज पूर्ण झाले. संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये सॅपमार्फत मिळालेल्या प्रशिक्षणामुळे माझ्या यशाचा मार्ग सुकर झाला आणि आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण झाले.**

**–धनश्री मरकड, विद्यार्थिनी**

# संवेदनशील मनाचे बहुआयामी व्यक्तिमत्व डॉ. अनिल अवचट

मुक्तांगणचे संस्थापक जेष्ठ समाजसेवक, पत्रकार, चित्रकार, प्रसिद्ध लेखक, बाल साहित्यकार डॉ अनिल अवचट ( बाबा ) यांची काल म्हणजे २७ जानेवारी रोजी चौथी पुण्यतिथी होती. चार वर्षापूर्वी म्हणजे २७ जानेवारी २०२२ रोजी अनिल अवचट यांचे वयाच्या ७८ व्य वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले होते. त्यांच्या निधनाने एक बहुआयामी, संवेदनशील व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ अनिल अवचट यांचा जन्म २६ ऑगस्ट १९४४ रोजी पुणे जिल्ह्यातील ओतूर या गावात झाला. लहानपणापासून अभ्यासात हुशार असणाऱ्या अनिल अवचट यांनी पुणे शहरातील बी जे मेडिकल कॉलेजमधून एम बी बी एस चे शिक्षण पूर्ण केले. कॉलेज जीवनात असताना त्यांनी अनेक चळवळीत भाग घेतला. युवक क्रांती दलाचे ते सक्रिय कार्यकर्ते होते. डॉ अनिल अवचट हे पेशाने पत्रकार आणि लेखक होते. आपली लेखणी त्यांनी कायमच सामान्य जनतेच्या हितासाठी वापरली. डॉ अनिल अवचट हे स्वतः पत्रकार होते तरी त्यांनी पत्रकारितेतील व्यावसायिकतेला नेहमीच नकार दिला. त्यांनी आपली पत्रकारिता नेहमीच गरिबी, भ्रष्टाचार, अन्यायाचे बळी असलेल्या जनतेच्या हितासाठी वापरली. डॉ अनिल अवचट यांनी गरीब, मजूर, दलीत, वंचित, भटक्या, विमुक्त जाती जमाती, वेश्या यांच्या प्रश्नांविषयी विपुल लेखन केले. विविध प्रश्नांवर लढा देताना आपले आयुष्य एखाद्या प्रश्नांसाठी खर्च करणाऱ्या कार्यकर्त्यांविषयीही त्यांनी लेखन केले. १९६९ साली त्यांचे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. त्या पुस्तकाचे नाव पूर्णिया असे होते. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. त्यांची एकूण २२ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांचे लेखन प्रेरणादायी होते. तरुण लेखकांचे ते प्रेरणास्रोत होते. तरुण लेखकांना मार्गदर्शन करण्यात ते नेहमीच पुढे असत. डॉ अनिल अवचटांच्या लिखणाप्रमाणेच त्यांचे सामाजिक कार्यही प्रेरणादायी आहे. डॉ अनिल अवचट हे पुण्यातील मुक्तांगण वयसनमुक्ती केंद्राचे संचालक होते. त्यांनी आपल्या पत्नी डॉ सुनंदा अवचट यांच्या सहकार्याने व्यसनमुक्तीची शोधलेली अनोखी पद्धत ही जगभरातील अनेक व्यसनमुक्ती केंद्रात वापरली जाते. मुक्तांगणच्या माध्यमातून त्यांनी हजारो तरुणांना व्यसनमुक्त केले आहे. व्यसनमुक्ती क्षेत्रात त्यांचे कार्य अतुलनीय असे आहे. डॉ अनिल अवचट हे केवळ लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते नव्हते तर एक उत्तम कलाकारही होते. त्यांची चित्रे, लाकडातील शिल्पे, ओरिगामी, छायाचित्रे, बासरी वादन यातून त्यांच्या अंगभूत कलांची ओळख होते. सामाजिक कार्यासाठी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. डॉ अनिल अवचट यांची पुस्तके सलग तीन वर्ष महाराष्ट्र शासनाने सर्वोत्कृष्ट पुस्तके म्हणून जाहीर केली आहेत. अमेरिकेतील ओहीओ प्रांतात झालेल्या आंतरराष्ट्रीय लेखकांच्या संमेलनात त्यांच्या साहित्याचा गौरव करण्यात आला होता. सातारा येथील न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे प्रतिष्ठान तर्फे दिला जाणारा सामाजिक न्याय पुरस्कार ( २००७ ) , साहित्य अकादमीतर्फे प्रथम बाल साहित्य पुरस्कार (२०१० ), महाराष्ट्र राज्य पुरस्कार ( २०११ ) तसेच त्यांच्या मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राला पुल कृतज्ञता पुरस्कार (२०१५ ) अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरिवण्यात आले आहे. त्यांच्या निधनाने संवेदनशील मनाचे बहुआयामी व्यक्तिमत्व हरपले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. डॉ अनिल अवचट यांना चौथ्या पुण्यतिथीनमित्त विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# आदर्श विद्या मंदिर येथे प्रजासत्ताक दिन साजरा

**नेवासा । विजय खंडागळे**

सोमवार ता. २६ जानेवारी रोजी सोनई येथील आदर्श विद्या मंदिर येथे भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन २२५ महिला पालकांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ७ वाजता प्रभात फेरी काढण्यात आली.

त्यानंतर ८.३० वाजता शाळेच्या नवीन मैदानावर संस्थेच्या अध्यक्षा जयश्री गडाख यांच्या हस्ते ध्वजाला मानवंदना देण्यात आली. संस्थेचे सचिव रविराज तुकाराम गडाख व भाऊसाहेब येळवंडे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या




अध्यक्षस्थानी बेल्हेकरवाडीच्या सरपंच विशाखा भरत बेल्हेकर होत्या.

कार्यक्रमात 'मंथन २०२५' परीक्षा व शासकीय चित्रकला स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. विद्यार्थ्यांनी संगीतमय कवायत सादर केली. अध्यक्षीय भाषणात बेल्हेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून राष्ट्रीय सणांचे महत्त्व सांगितले. मोठ्या संख्येने महिला पालक उपस्थित असल्याने झेंडावंदनानंतर हळदी-कुंकू कार्यक्रमही आनंदात पार पडला. उपस्थित महिलांना जयश्री रविराज गडाख यांच्या हस्ते वाण व तिळगूळ देण्यात आले. प्रस्तावना दरंदले ए. बी. यांनी केली. सूत्रसंचालन काळे पी. आर. व बेल्हेकर एम. यू. यांनी केले, तर आभार जाधव एम. बी. यांनी मानले.

# लांब उडीत झेप घेत यशाची उंची गाठली

## रेसिडेन्शियल कॉलेजच्या आदित्य साठेचा गौरव



**अहमदनगर । रयत समाचार**

येथील नामांकित रेसिडेन्शियल ज्युनियर कॉलेजचा विद्यार्थी आदित्य अशोक साठे याने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत कॉलेजच्या नावाला उज्ज्वल प्रतिष्ठा मिळवून दिली. आंतरमहाविद्यालयीन लांब उडी (Long Jump) स्पर्धेत आदित्यने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या दैदिप्यमान यशाबद्दल कॉलेज प्रशासनाच्या वतीने आदित्यचा विशेष सत्कार करण्यात आला. उपप्राचार्य दादासाहेब वांढेकर यांच्या हस्ते त्याला ट्रॉफी व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी बोलताना उपप्राचार्य वांढेकर यांनी आदित्यच्या जिद्द, सातत्य आणि मेहनतीचे मनापासून कौतुक केले तसेच भविष्यातील क्रीडा कारकिर्दीसाठी त्याला शुभेच्छा दिल्या. आदित्यच्या या यशामुळे कॉलेज परिसरात आनंदाचे वातावरण असून, शिक्षकवृंद, क्रीडा मार्गदर्शक आणि विद्यार्थी मित्रांकडून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्याच्या या यशाने रेसिडेन्शियल ज्युनियर कॉलेजच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

# विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीसोबत व्यवहारिक ज्ञान आत्मसात करावे- डॉ. मगर



**अहमदनगर । भगवान राऊत**

विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीबरोबरच व्यवहारिक व कौशल्याधारित ज्ञान आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन होगणास इंडिया प्रा. लि.चे ऑपरेशन डायरेक्टर डॉ. शरदकुमार मगर यांनी केले. पाईपलाईन रोड येथील बायजाबाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या दुर्गादेवी नय्यर शाळेत होगणास इंडिया प्रा. लि.च्या सी.एस.आर. निधीतून मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह बांधण्यात आले असून, त्याच्या लोकार्पण सोहळा व बाल आनंद मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. मगर म्हणाले की, पूर्वी शिक्षणात प्रामुख्याने पाठ्यपुस्तकी ज्ञानावर भर दिला जात होता. मात्र सध्याच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना व्यवहारिक, कौशल्याधारित व जीवनोपयोगी ज्ञानाची गरज आहे. हेच ज्ञान त्यांच्या भावी आयुष्यातील यशाचा पाया ठरते.फ कार्यक्रमास बायजाबाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष काकासाहेब नय्यर, महानगरपालिका नगरसेविका संध्या पवार, होगणासचे विवेक वाघ, नवजीवन प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार, संस्थेचे सचिव बाळासाहेब पवार आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यालयाची शैक्षणिक प्रगती व विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये मिळवलेल्या यशाबद्दल डॉ. मगर व संध्या पवार यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. तसेच शिक्षकवर्गाच्या योगदानाचेही त्यांनी अभिनंदन केले. भविष्यात विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व आवश्यक मदत देण्याचे आश्वासन डॉ. मगर यांनी दिले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नवजीवन प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांना गोष्टींची पुस्तके वाटप करण्यात आली. कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष बापूराव आंधळे, खजिनदार भास्करराव गोरे, तानाजी काकड, अशोक बारस्कर यांच्यासह मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक श्रीकृष्ण पवार यांनी आभार मानले. त्यानंतर प्रमुख पाहुणे व उपस्थितांनी खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला.

# शंभूक वस्तीगृहात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

बहुजन शिक्षण संघ संचालित शंभूक विद्यार्थी वसतिगृहात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक संघाचे अध्यक्ष कॉं. बाळासाहेब सुरुडे व परिवर्तन फाऊंडेशनचे खजिनदार भीमराव खंडीझोड यांच्या हस्ते प्रथम विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

त्यानंतर कॉं. बाळासाहेब सुरुडे यांच्या हस्ते वसतिगृहाचे ध्वजारोहण करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब आल्हाट व राधिका क्षीरसागर यांच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. नगरपालिका शिक्षण मंडळाचे माजी सदस्य सुरेश दुगड यांच्या वतीने




विद्यार्थ्यांना दूध व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. सचिन अभंग, एम. एस. गायकवाड, प्रजासत्ताक हॉस्पिटलचे बाळासाहेब मोरे व माहेश्वरी राज्यस्थानी महिला मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. प्रजासत्ताक दिनानिमित्त वसतिगृहातील संग्राम तुजारे, ऋषिकेश सुलताने, नमो करंडे, साई गायकवाड, भरत भालेराव, सुमित घुले, अजय बर्डे, आर्यन घुले या विद्यार्थ्यांनी देशावर आधारित भाषणे केली.

कार्तिक चव्हाण, प्रणव तागड, नरेंद्र जाधव, सागर निंभोरे, सिद्धार्थ गायकवाड, ओम जवादे, गौरव कहाते, अमोल घुले व अजित जाधव यांनी देशभक्तीपर गीते सादर केली. वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने प्रात्यक्षिक सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. याप्रसंगी विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे डॉ. सलीम शेख, हिंद सेवा मंडळाचे डॉ. नवनीत जोशी, मिशन वात्सल्य शासकीय समितीचे सदस्य मिलिंदकुमार साळवे, नामदेव शिंपी समाज पंच मंडळाचे अध्यक्ष कैलास खंदारे, पी.आर.पी.चे संतोष मोकळ, भाजपा अल्पसंख्याकचे साजिदभाई शेख, बहुजन वंचित आघाडीचे तालुकाध्यक्ष डॉ. गौतम चित्ते, वंचितचे संतोष त्रिभुवन, सुनील वाघमारे, विद्रोही विद्यार्थी संघटनेचे ॲड. अमोल सोनवणे, परिवर्तन फाऊंडेशनचे गोरख आढाव, सामाजिक कार्यकर्ते अरुणराव मंडलिक, शासकीय वसतिगृहाचे काळमेख सर, गायकवाड मॅडम, कविता दिवे, शिवानी दिवे, सरिता दिवे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिद्धार्थ दिवे यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक दिवे यांनी केले तर आभार प्रदर्शन ॲड. अमोल सोनवणे यांनी केले.



**श्रीरामपूर नगर परिषदेच्यावतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त लोकमान्य टिळक वाचनालयात माजी सैनिकांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे, उपमुख्याधिकारी, नगरसेवक-नगरसेविका तसेच नगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.** (छाया : अनिल पांडे)

## ग्रामविकासात महिलांची वज्रमुठ महत्त्वाची- नगराध्यक्षा खेतमाळीस

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत हळदीकुंकू कार्यक्रम

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

आदर्श गाव म्हणून ओळख असलेल्या तांदळी दुमाला येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत महिलांसाठी आयोजित हळदीकुंकू कार्यक्रम उत्साहात पार पडला. महिलांचा सक्रिय सहभाग ग्रामविकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असून महिलांची वज्रमुठ गावाच्या सर्वांगीण विकासाला दिशा देऊ शकते, असे प्रतिपादन नगराध्यक्षा सुनीता संतोष खेतमाळीस यांनी यावेळी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच अनिता निगडे होत्या. ग्रामपंचायत अधिकारी मनीषा काळंगे



यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमात उपस्थित महिलांना प्लास्टिकमुक्त गाव व बालविवाहमुक्त गाव याबाबत सामूहिक शपथ देण्यात आली. आढळगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने महिलांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच समाजातील एकल महिलांचा सन्मान करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली.

कार्यक्रमात ओला व सुका कचरा व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले तसेच ग्रामस्थांना डस्टबिनचे वाटप करण्यात आले. जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यावेळी श्रीगोंदा नगरपरिषद उपाध्यक्षा अलका सुनील अनभुले यांनी ऑक्सिजनचे महत्त्व व गाव विकास एक उपाय या विषयावर महिलांना मार्गदर्शन केले.

हा कार्यक्रम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ, श्रीगोंदा गटविकास अधिकारी राणी फराटे तसेच विस्तार अधिकारी सारिका हराळ यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमास उपनगराध्यक्षा अलका सुनील अनभुले, लोकनियुक्त सरपंच संजय निगडे, उपसरपंच वैशाली संतोष हराळ, ग्रामपंचायत सदस्य, माजी पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार तसेच मोठ्या संख्येने महिला व ग्रामस्थ उपस्थित होते. महिलांच्या सहभागातून स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण व सामाजिक जबाबदारीचा संदेश देणारा हा उपक्रम तांदळी दुमाला ग्रामविकासासाठी प्रेरणादायी ठरत असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.